## औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक ३१.१२.१९९१ रोजी झालेल्या ६९ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १] | श्री. ईश्वर भोसीकर | :- | सभापती, औरंगाबाद मंडळ |
| २] | श्री. विजय देशपांडे | :- | उपसभापती, औरंगाबाद मंडळ. |
| ३] | श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरु चारठाणकर. | :- | सदस्य |
| ४] | डॉ. गोविंद गारे, आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद. | :- | सदस्य |
| ५] | श्री. दे. हि. मुन उप संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, औरंगाबाद. | :- | सदस्य |

विषय क्र. १:- दिनांक ३०.११.९१ रोजी झालेल्या ६८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ४१४:

मंडळाच्या ६८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविण्यात आला व सविस्तर चर्चा होऊन दिनांक ३०.११.१९९१ रोजी झालेल्या ६८ व्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

विषय क्र. २:- सन १९९१-९२ या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक व सन १९९२-९३ वर्षाचे प्रस्तावित अंदाजपत्रक.

ठराव क्र. ४१५:

बाब टिप्पणीमध्ये उदधृत केलेल्या सर्व बाबीवर चर्चा होऊन मंडळाने सन १९९१-९२ या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक व सन १९९२-९३ वर्षाचे प्रस्तावित अंदाजपत्रकात मान्यता दिली.

धुळे.

धुळे नगरपालिकेने "३८२ झोपडपट्टी" या झोपडपट्टी सुधारणा कामास प्रशासकीय मान्यतेसाठी रु. ३,७०,४८७ चे अंदाजपत्रक सादर केले आहे व नियमाप्रमाणे त्यास २,८२,६६६/- रुपयाची प्रशासकीय मान्यता देण्यास मंजूरी दिली. परंतू ही मंजूरी धुळे नगरपरिषदेने सदर झोपडपट्टी घोषित झाल्याबाबतचे राजपत्र सादर करण्याच्या अटीवर देण्यात येत आहे.

आयत्यावेळचा विषय नसल्याने सभापतींच्या परवानगीने सभा संपली.

गा.